**TRANSLATED COPY**

**(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्याय-निर्णयाचा मराठी अनुवाद)**

म्युटेशन न्याय प्रक्रियाः व्याप्ती

*(एफ.एम.रैस,न्या.)*

हिजिनो व्ही. दे एम. व्हिएगस आणि इतर — याचिकादार

विरुद्ध

थॉमस डायस आणि अन्य एक — प्रतिवादी

(अ) **गोवा भू-महसूल संहिता, 1968, एस. 96** – म्युटेशन न्यायप्रक्रिया – व्याप्ती – म्युटेशनच्या नोंदी करणाऱ्या अधिकाऱ्यांना पक्षकारांचे मालकीहक्क ठरविण्याचा अधिकार नाही – भू-महसूल संहितेच्या तरतुदींच्या दृष्टीने म्युटेशन न्यायप्रक्रियेत चौकशीची व्याप्ती अगदीच मर्यादित आहे. (परिच्छेद 7)

---

डब्ल्यू.पी.क्र. 2010 ची 45, जी 19-8-2013 मध्ये निकालात काढण्यात आली. (पणजी-गोवा)

(b) **गोवा भू-महसूल संहिता, 1968, एस. 96** – याचिकादारांनी वादग्रस्त मालमत्ता आपल्या वडिलांकडून प्राप्त केली - उत्तराधिकारी करारपत्राच्या आधारावर म्युटेशन केले – जोपर्यंत मालमत्ता मृत व्यक्तीच्या नावावर असत नाही, तोपर्यंत वारसा हक्क करारपत्र हे स्वतः वादग्रस्त मालमत्तेवर कोणताच हक्क सांगू शकत नाही. (परिच्छेद 6)

याचिकादारांसाठीः *एस. जी. देसाई, ज्येष्ठ वकील, बी. महात्मे यांच्या सोबत*

प्रतिवादींसाठी : *जे. ई. कोएलो पेरेरा, ज्येष्ठ वकील, व्ही. कोरगांवकर यांच्या सोबत*

*संदर्भित केस:*

*रोहिदास विठ्ठल पाटील आणि इतर विरुद्ध उपविभागीय अधिकारी (महसूल) नंदुरबार आणि इतर, 1993 बॉम्बे सिव्हिल जर्नल 431* (परिच्छेद 10)

**तोंडी निकालः-** याचिकादारांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील श्री. एस. जी. देसाई आणि प्रतिवादीची बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील श्री. जे. ई. कोएलो पेरेरा यांची बाजू ऐकून घेतली.

2. वरील याचिकेत भू-महसूल अपील क्रमांक 225/2001 मध्ये दिलेला 23-0-2009 चा निकाल रद्द करावा, तसेच दिनांक 26-5-2010 ची सूचना रद्द करावी आणि रद्दबातल ठरवावी अशी विनंती केली होती.

3. थोडक्यात, याचिकादारांनी कथन केल्याप्रमाणे, केसची वस्तुस्थिती अशी आहे की, याचिकादारांनी केळशी गावातील सर्वेक्षण क्रमांक 128/10 खाली सर्वेक्षण केलेल्या मालमत्तेशी संबंधित हक्काच्या नोंदीमध्ये आपले नाव समाविष्ट करण्यासाठी सासष्टीच्या संयुक्त-मामलेदारांकडे अर्ज केला होता. याचिकादारांची केस खोटी असल्याचा आरोप करीत, प्रतिवादींनी म्युटेशनच्या दाव्यावर आक्षेप आणला. विद्वान संयुक्त-मामलेदारांनी त्यांच्या 29-11-2000 च्या आदेशाद्वारे प्रतिवादींनी दाखल केलेला आक्षेप नाकारून, याचिकादारांनी दाखल केलेला म्युटेशनचा अर्ज मंजूर केला. या आदेशामुळे व्यथित झालेल्या प्रतिवादींनी उप-जिल्हाधिकारी आणि एस.डी.ओ., दक्षिण गोवा, मडगाव यांच्याकडे अपील क्रमांक 2/2001 सह पहिली अपील दाखल केले होते. उप-जिल्हाधिकारी आणि एस.डी.ओ. यांनी दिनांक 13-11-2001 च्या आदेशाद्वारे प्रतिवादींनी दाखल केलेले अपील फेटाळले. विद्वान उप-जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या प्रतिवादींनी प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे अपील दाखल केले, जे दिनांक 23-9-2009 च्या आदेशाद्वारे निकालात काढण्यात आले, ज्याद्वारे अपील मंजूर केले आणि कनिष्ट अधिकाऱ्यांचा आक्षेपित आदेश बेकायदेशीर आणि रद्दबातल ठरवला. परिणामी, केळशी गावातील सर्वेक्षण क्रमांक 128/10 मध्ये असलेल्या मालमत्तेच्या संदर्भात 1&XIV च्या उताऱ्यामध्ये (फॉर्म 1&XIV) असलेल्या नोंदी पुनर्संचयित करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले. त्या निर्णयामुळे व्यथित होऊन, याचिकादारांनी सध्याच्या रीट याचिकेला प्राधान्य दिले आहे.

4. याचिकादारांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील एस. जी. देसाई यांनी सर्वेक्षण क्रमांक 128/10 च्या केसच्या मालमत्तेसंदर्भातील सर्वेक्षणाच्या नोंदी जेराल्दिन कॉश्ता यांच्या नावावर असल्याच्या आधारामुळे हा वादग्रस्त निर्णय देण्यावर टिका केली. 1955 साली सुरू झालेल्या वस्तुसूची कार्यवाही (इन्व्हेंट्री प्रोसिडींग्ज) न्यायप्रक्रियेत पाश्कुआल ज्योकीम मिलाग्रीस यांच्या मृत्युनंतर 3-5-1955 रोजी झालेल्या लिलावाच्या प्रक्रियेत मालमत्तेची वाटणी झाली होती आणि पहिल्या दोन  याचिकादारांचे स्वर्गीय वडिल आणि तिसऱ्या याचिकादाराच्या सासऱ्याने ही मालमत्ता लिलावातून घेतली होती, हा मुद्दा विद्वान ज्येष्ठ वकिलांनी निदर्शनास आणून दिला. 31-8-1971 रोजी भू-संपादन न्याय प्रक्रियेत दिलेल्या

आदेशात, अशा संपादनाचा मोबदला पहिल्या  दोन याचिकादारांच्या स्वर्गीय वडिलांना दिला होता याकडे ज्येष्ठ वकिलांनी लक्ष वेधून घेतले. सर्वेक्षण क्रमांक 128/10 अंतर्गत सर्वेक्षण केलेल्या वादग्रस्त जमिनीचा प्रत्यक्ष ताबा याचिकादारांकडे होता आणि त्यामुळे हक्काची नोंद जाहीर करण्यापूर्वी, याचिकादारांनी सर्वेक्षणाच्या नोंदीमध्ये त्यांच्या नावांचा उल्लेख करण्यासाठी अर्ज दाखल केला होता, असेही ज्येष्ठ वकिलांनी पुढे सांगितले. पहिल्या दोन याचिकादारांनी इतर गोष्टींसह एक अर्ज दाखल केला होता, ज्यामध्ये सर्वेक्षणाच्या नोंदीमध्ये जेराल्दिन कॉश्ता नावाच्या, जिला अशा न्यायप्रक्रियेत कब्जेदार म्हणून दाखवले आहे, अशा अस्तित्वात नसलेल्या व्यक्तीचे नाव आहे, असेही ज्येष्ठ वकिलांनी नमूद केले. याचिकदारांनी 5-10-1998 रोजी उत्तराधिकारी करारपत्रही सादर केले आहे आणि त्यानंतर भू-महसूल संहितेच्या कलम 96 अंतर्गत सर्वेक्षणाच्या नोंदीमध्ये आपले नाव नोंदविण्यासाठी अर्ज केला होता असे विद्वान ज्येष्ठ वकिलांनी सांगितले. याचिकादारांनी दाखल केलेल्या अर्जावर आक्षेप मागविणारी सार्वजनिक सूचना (पब्लिक नोटीस) जारी केल्यानंतर अशा न्यायप्रक्रियेत प्रतिवादींनी आपला आक्षेप नोंद केला होता, जो 29-11-2000 च्या आदेशाद्वारे फेटाळण्यात आला होता असेही ज्येष्ठ वकिलांनी पुढे सांगितले. त्यानंतर, विद्वान ज्येष्ठ वकिलांनी, विद्वान न्यायाधिकरणाने दिलेला वादग्रत निर्णय आणि उप-जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशा विरुद्ध दाखल केलेले दुसरे अपील ग्राह्य धरले नाही कारण, त्यांच्या मते, अशा प्रकारचे अपील जरी करायचे असले, तरी ते जिल्हाधिकाऱ्यांसमोर करायला हवे, असे माझ्या निदर्शनास आणून दिले. जेराल्दिन कॉश्ता ही अस्तित्वात नसलेली व्यक्ती असल्याने, याचिकादारांना म्युटेशनची न्यायप्रक्रिया दाखल करण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि म्हणून, विद्वान न्यायाधिकरणाने या आदेशात हस्तक्षेप करणे योग्य नाही असेही विद्वान ज्येष्ठ वकिलांनी सांगितले. विद्वान न्यायाधिकरणाच्या निर्णयाद्वारे असे निदर्शनास आणून दिले की, विद्वान न्यायाधिकरणाने चुकीच्या पद्धतीने रेकॉर्ड घेतले आहेत आणि प्रतिवादींनी दाखल केलेले अपील मान्य करून घेतले आहेत, असेही ज्येष्ठ वकिलांनी मला सांगितले. विद्वान न्यायाधिकरणाने दिलेला वादग्रस्त निर्णय बेकायदेशीर ठरवून रद्द करावा असे विद्वान ज्येष्ठ वकिलांचे म्हणणे आहे.

5. दुसऱ्या बाजूला, प्रतिवादीची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील श्री. जे. ई. कोएलो पेरेरा यांनी या आक्षेपित न्यायनिवाड्याचे समर्थन केले. याचिकादाराचा कथित दावा हा भू-महसूल संहिता लागू होण्याच्या आधी, 1955 साली झालेल्या वाटणीवर आधारित आहे, असे विद्वान वकिलांनी स्पष्ट केले. अशा परिस्थितीत, भू-महसूल संहितेच्या कलम 96 अंतर्गत

केलेला अर्ज ग्राह्य धरू नये, असे विद्वान वकिलांनी पुढे सांगितले. महसूल संहिता लागू झाल्यानंतरच, केलेला व्यवहार किंवा हस्तांतरणासंदर्भातच भू-महसूल संहितेखाली म्युटेशन नोंदी अधिकाऱ्यांना करता येतात, असे विद्वान ज्येष्ठ वकिलांनी सांगितले. याचिकादार जेराल्दिन कॉश्ता यांच्याकडून कसलेच हक्क मागत नाही आणि त्यामुळे जेराल्दिन कॉश्ता यांचे नाव काढून टाकून, त्यांची नावे म्युटेशन प्रक्रियेत समाविष्ट करण्याची बाब पूर्णतः चुकीची आहे, असे विद्वान वकिलांनी सांगितले. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे, ही मालमत्ता गाल्दिनो कॉश्ता यांची आहे, जे प्रतिवादीचे काका आहेत आणि त्यांचे नाव चुकीच्या पद्धतीने जेराल्दिन कॉश्ता म्हणून दाखविले आहे. केसमध्ये असलेली मालमत्ता सध्या प्रतिवादीजवळ आहे आणि म्हणून, प्रतिवादीने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधाराने, याचिकादार करीत असलेल्या म्युटेशनला आक्षेप घेण्याचा प्रतिवादीला अधिकार आहे यावर वाद निर्माण करता येत नाही, असे विद्वान ज्येष्ठ वकिलांनी पुढे सांगितले. भू-महसूल संहितेच्या कलम 6 च्या प्रमाणे, उप-जिल्हाधिकारी हे जिल्हाधिकारी म्हणूनही काम पाहतात आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे विद्वान न्यायाधिकरणासमोर केलेले अपील हे सुद्धा पूर्णपणे समक्ष आहे, असे ज्येष्ठ वकिलांनी सांगितले.

कोणत्याही परिस्थितीत, विद्वान न्यायाधिकरणासमोर असा आक्षेप उपस्थित केला नव्हता आणि न्यायाधिकरण हे जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा वरच्या दर्ज्याचे आहे आणि म्हणून विद्वान न्यायाधिकरणाने अपील निकालात काढणे हे अंगभूत अधिकारक्षेत्राबाहेरील आहे असे म्हणता येत नाही. त्यासाठी, वरील याचिका नाकारावी अशी मागणी विद्वान ज्येष्ठ वकिलांनी केली.

6. दोन्ही पक्षांची बाजू मांडणाऱ्या विद्वान ज्येष्ठ वकिलांच्या युक्तीवादाचा मी विचार केला. विद्वान ज्येष्ठ वकिलांच्या मदतीने, मी संबंधित आक्षेपित न्यायनिवाडा आणि रेकॉर्डवर असलेल्या सामुग्रीचा अभ्यास केला. क्रमांक 128/10 खाली सर्वेक्षण केलेल्या वादग्रस्त मालमत्तेच्या संदर्भातील सर्वेक्षणाच्या नोंदी पाहिल्यानंतर, कब्जेदार कॉलममध्ये जेराल्दिन कॉश्ता यांचे नाव आहे. सध्याच्या केसमध्ये, याचिकादारांचा असा युक्तीवाद नाही, की त्यांनी उपरोल्लेखित जेराल्दिन कॉश्ता यांच्याकडून मालकीहक्क किंवा हितसंबंधाने काही घेतलेले आहे. भू-महसूल संहितेच्या कलम 96 खाली अर्ज दाखल करण्याआधी, क्रमांक 128/10 खाली सर्वेक्षण केलेली मालमत्ता आधीच प्रख्यापित केली होती, याबाबत काहीच तक्रार नाही. याचिकादार क्रमांक 1 आणि 2 यांच्या वडिलांनी दाखल केलेल्या अर्जाचा अभ्यास केल्यानंतर, वादग्रस्त मालमत्तेवरील याचिकादारांचा कथित दावा हा 1955 साली

झालेल्या वाटणीच्या आधारावर आहे. भू-महसूल संहितेच्या कलम 96 प्रमाणे, उत्तराधिकार, उत्तरजीविता, वारसा, विभाजन, खरेदी, गहाणवट, दान, भाडेपट्टा वा इतर कोणत्याही जमिनीचा धारक, कब्जेदार, गहाणवट, जमीनदार, भाडेकरू वा कोणत्याही जमिनीचा सरकारी भाडेकरू म्हणून कोणतेही हक्क प्राप्त करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अशा संपादनाचा लेखी अहवाल दिला पाहिजे. यावरून असे दिसते की, असे स्वरूप किंवा हस्तांतरण भू-महसूल संहिता लागू झाल्यानंतरच केले जाईल. सध्याच्या खटल्यामध्ये, याचिकादारांच्या वडिलांनी 1955 साली झालेल्या वाटणीच्या आधारावर, भू-महसूल संहितेच्या कलम 96 अंतर्गत अर्ज दाखल केला नव्हता. सर्वप्रथम, सदर मालमत्ता सर्वेक्षण क्रमांक 128/10 खाली असल्याचा, याचिकादारांचा हा युक्तीवाद ग्राह्य धरता येणार नाही, कारण 1955 साली झालेल्या वाटणीच्यावेळी कोणत्याही सर्वे क्रमांकाचा प्रश्नच उद्भवत नाही. याचिकादारांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील एस. जी. देसाई यांनी सांगितले की, भू-महसूल संहिता लागू झाल्यानंतर, उत्तराधिकार करारपत्र तयार केले होते, ज्याच्यावरून असे दिसून आले आहे की, याचिकादारांनी वादग्रस्त मालमत्ता ही आपल्या वडिलांकडून वारसा हक्काने मिळविली आहे. वादग्रस्त मालमत्ता ही मयत व्यक्तीच्या नावावर नसल्यास, उत्तराधिकार करारपत्र हे निश्चीतपणाने कसलाच हक्क सिद्ध करू शकत नाही, असे मला वाटते. त्यासाठी, सध्याच्या प्रकरणात वस्तुस्थिती आणि परिस्थितीमध्ये उत्तराधिकार करारपत्राच्या आधारावर, कोणतेही म्युटेशन करण्याचा प्रश्न, उद्भवणार नाही.

7. म्युटेशनच्या न्यायप्रक्रियेत म्युटेशन नोंदी करणाऱ्या अधिकाऱ्यांना पक्षकारांचे मालकीहक्क ठरविण्याचा अधिकार नाही, हे अगोदरच सर्वमान्य झाले आहे. कोणत्याही संदर्भात, म्युटेशन न्यायप्रक्रियेतील निर्णय मालकीहक्क तयार करत नाही किंवा विफल करीत नाही आणि ते त्या संदर्भात नेहमी दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन असतात. त्यासाठी, भू-महसूल संहितेतील तरतुदींच्या दृष्टीने, म्युटेशन न्यायप्रक्रियेत चौकशीची व्याप्ती अगदीच मर्यादित असते. प्रस्तुत प्रकरणात, याचिकादारांचा म्युटेशनाचा दावा हा 1955 साली झालेल्या वाटणीच्या आधारावर आहे, जेव्हा मालमत्तेचा सर्वेक्षण क्रमांक जाहीर केला नव्हता. त्यासाठी, याचिकादाराला संहितेच्या कलम 96 प्रमाणे, म्युटेशनसाठी अर्ज दाखल करणे शक्य नव्हते. त्या बाबीच्या दृष्टीने, विद्वान न्यायाधिकरणाने हा आक्षेपित न्यायनिवाडा देताना अंगभूत त्रुटी केलेली नाही असे मला वाटते.

8. याचिकादारांच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील श्री. देसाई यांच्या युक्तीवादाच्या संदर्भात, सध्या मालमत्ता याचिकादारांच्या ताब्यात आहे आणि जसे, भू-

महसूल संहितेंतर्गत अधिकाऱ्यांना आक्षेपित न्यायनिवाडा देण्याचा अधिकार नाही, तसेच खालच्या अधिकाऱ्यांनाही तशा प्रकरणात न्यायनिवाडा देता येत नाही. कोणत्याही परिस्थितीत, म्युटेशन अर्जावर विचार करताना, खालच्या अधिकाऱ्यांना त्या मुद्द्यांवर अभिनिर्णय घेता येत नाही असे मला वाटते.

9. याचिकादाराच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील श्री. देसाई यांच्या युक्तीवादाच्या संदर्भात, विद्वान न्यायाधिकरणासमोर मांडलेले अपील हे सक्षम नसलेले आणि विद्वान न्यायाधिकरणाने दिलेला आक्षेपित निकाल पाहिल्यास, मला असे वाटते की विद्वान न्यायाधिकरणासमोर त्या संदर्भात कसलाच आक्षेप घेण्यात आला नव्हता. त्याशिवाय, विद्वान न्यायाधिकरणासमोर मांडलेला युक्तीवाद पाहिल्यास, विद्वान न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्राकडे विसंगत असे कोणतेच म्हणणे विद्वान न्यायाधिकरणासमोर मांडले गेलेले नाही. भू-महसूल संहितेच्या कलम 188 तील तरतुदींचा अभ्यास केल्यानंतर, त्याच्या पोट-कलम (अ) खाली उप-विभागीय अधिकाऱ्याच्या अधिनस्थ अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाला आव्हान देणारे अपील उप-विभागीय अधिकाऱ्याकडे केले जाईल असे सांगितले आहे. सध्याच्या प्रकरणात, प्रतिवादीने संयुक्त-मामलेदाराच्या आदेशाविरुद्ध उप-जिल्हाधिकाऱ्याकडे अपील दाखल करून अशा अपिलीय मंचाचा लाभ घेतला आहे. भू-महसूल संहितेच्या कलम 188 च्या उपकलम (2) च्या पोटकलम (अ) खाली, अपील दाखल केल्यास, ती अपील जिल्हाधिकाऱ्याकडे जाईल, आणि जर कलम 188 च्या उपकलम (1) च्या पोट-कलम (ब) खाली अपील दाखल केल्यास, ते अपील विद्वान न्यायाधिकरणासमोर जाईल. सध्याच्या प्रकरणात, भू-महसूल संहितेचे कलम 96 प्रमाणे, जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करून उप-जिल्हाधिकाऱ्याने हा आक्षेपित आदेश दिला, असे गृहीत धरून प्रतिवादीने विद्वान न्यायाधिकरणासमोर अशा दुसऱ्या अपिलला प्राधान्य दिले आहे. अशा परिस्थितींमध्ये, विद्वान न्यायाधिकरणासमोर अपिलला अंगभूत अधिकारक्षेत्राची उणीव आहे असे म्हणता येणार नाही. विद्वान ज्येष्ठ वकील श्री. एस. देसाई, अशी अपील जिल्हाधिकाऱ्यासमोर दाखल करणे योग्य असले तरीही हे अपील विद्वान न्यायाधिकरण असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या वरील अधिकरिणीकडे दाखल केले आणि त्यावर याचिकादारांनी कसलाच आक्षेप घेतलेला नाही, या कारणास्तव भारतीय संविधानाच्या कलम 227 खाली विद्वान न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णयात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही असे मला वाटते. त्याशिवाय, याचिकादारांनी या बाबतीत प्रसंगानुरूप कसलाच पूर्वग्रह दाखवलेला नाही.

10. *रोहिदास विठ्ठल पाटील आणि इतर विरुद्ध उप-विभागीय अधिकारी (महसूल) नंदुरबार आणि इतर, या खटल्यात 1993 मध्ये बॉम्बे सिव्हिल जर्नल 431* मध्ये दिलेल्या न्याय निवाड्यात या न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधिशांनी परिच्छेद 3 वर असे म्हटले आहेः

> "3. याचिकादारांच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान वकील श्री. नाईक यांनी सांगितले की, म्युटेशन नोंदी प्रमाणित करण्याच्या दिनांका पासून बराच काळ सरल्या नंतर, प्रतिवादी क्रमांक 3 ने केलेल्या अपिलवर सुनावणी घेण्यात महसूल अधिकाऱ्यांची चूक झाली होती. पक्षकारांना सूचना दिल्यानंतर, विधीवत प्रमाणित केलेल्या म्युटेशन नोंदीमध्ये, प्राथमिकतेच्या दृष्टीने सुद्धा अपिलीय अधिकारिणीने विखंडन करायला नको होते असा युक्तीवाद वकिलांनी केला. आमच्या रीट अधिकारक्षेत्राचा वापर करून आम्ही या युक्तीवादाची तपासणी करण्यास इच्छुक नाही. भू-महसूल संहिते खाली गावाच्या नोंदीत नोंदी करण्यासाठी महसूल अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशातील मालमत्तेतील पक्षकारांचे मालकीहक्क निश्चीत होत नाहीत, हे आता अगदी स्पष्ट झाले आहे. हक्काच्या नोंदीमध्ये, नोंदी वा मालकीहक्क निर्माण करीत नाहीत किंवा मालकीहक्क नष्ट करीत नाहीत. याचिकादारांनी यापूर्वीच दिवाणी न्यायालयामध्ये खटला दाखल केलेला आहे आणि त्यामध्ये विभाजनाच्या वैधतेचा मुद्दा तपासला जाणार आहे. दिवाणी न्यायालयात जो काही निर्णय दिला जाईल, तो महसूल अधिकाऱ्यांवर बंधनकारक असेल आणि दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे महसूल अभिलेखांतील नोंदी करणे हे महसूल अधिकाऱ्यांवर बंधनकारक असेल. अशा परिस्थितींमध्ये, महसूल अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशांची वैधता तपासण्यासाठी रीट याचिकेवर सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही."

11. या न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधिशांच्या निरिक्षणांची दखल घेतल्यानंतर, म्युटेशनची न्याय प्रक्रिया ही पक्षकारांचा मालकीहक्क विफल किंवा निर्माण करू शकत नसल्याने, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 227 खाली या न्यायालयाच्या हस्तक्षेपाचे कोणतेही कारण नाही असे मला दिसून आले आहे. सध्याच्या प्रकरणात, प्रतिवादीने सर्वेक्षण नोंदीमध्ये आपले नाव समाविष्ट करण्याचा प्रयत्न केलेला नाही आणि त्यामुळे नोंदी जेराल्दिन कॉश्ता यांच्याच नावावर राहतील, हे लक्षांत घ्यावे लागेल. अशा परिस्थितींमध्ये, उभय पक्षांना आपापल्या हक्कांचा, कायद्यांप्रमाणे निर्णय घेण्यासाठी योग्य ती न्याय प्रक्रिया सुरू करण्याचे स्वातंत्र्य आहे. या न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे, अशा

तंट्यावर दिवाणी न्यायालयाने निर्णय दिला पाहिजे. कोणत्याही पक्षाने अशा उपायांचा असा फायदा घेतल्यास, गुणवत्तेच्या आधारावर उभय पक्षांचे सर्व युक्तीवाद मुक्त असतील.

12. वरील बाबींच्या अधीन राहून, याचिकादारांकडून आक्षेपित निर्णयात हस्तक्षेप करण्यासारखी कोणतीच केस न्यायालयासमोर आणली नाही असे मला दिसते. त्यासाठी याचिका नाकारली आहे. न्यादेश निष्प्रभाव ठरतो.

*याचिका फेटाळली.*

***अस्वीकरण***

*या न्यानिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेत त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणासाठी वापर करता येणार नाही, तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सगळ्या व्यवहारिक आणि कार्यालयीन वापरासाठी विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाचे निष्पादन आणि अंमलबजावणीसाठी वैध मानला जाईल.*

**TRANSLATED BY DIRECTORATE OF OFFICIAL LANGUAGE, PANAJI, GOA**